नि.मु.क्र.८३/२०१३,

सुरेश सोनुजी वि. भिमराव शिवराम व ५.

## निशाणी ३८ चे अर्जावरील आदेश
## (आदेश दिनांक १२.०२.२०१५)

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ करुन कैफियत व जबाब अभिलेखावर दाखल करुन घेण्याकामी परवानगी मिळावी याकरिता दाखल केलेला आहे. सदरचे अर्जावर वादी यांचेतर्फे म्हणणे देवुन सक्तरित्या हरकत नोंदविण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने प्रतिवादी क्र.१ व २ यांना दि.२४/३/२०१४ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. अर्जाचे समर्थनार्थ प्रतिवादी यांनी वैदयकीय प्रमाणपत्र हजर केलेले नाही या मुददयांवर हरकत उपस्थित करुन अर्ज नामंजुर व्हावा विकल्पेकरुन मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्च देण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. दोन्ही बाजुचे विधितज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०३. अभिलेख पाहिला असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी मौजे मंगरुळ गावचे शिवारातील गट क्र.६८/२ या अचल मिळकतीचे अनुषंगाने खरेदीखत करुन मिळावे व विपक्षी नुकसान भरपाई म्हणुन २५०००० व त्यावर दावा दाखल तारखेपासुन १८टक्के दराने व्याज मिळावे यासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असेही दिसुन येते की, प्रस्तुतच्या दाव्यामध्ये नि.क्र.१ वर अदयापपोवेतो प्रतिवादी क्र.१ व २ यांचे विरुध्द कोणतेही आदेश पारित झालेले दिसुन येत नाही. अभिलेखावरुन असेही दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ व २ हे नि. क्र.२५ ला दि.२९/०४/२०१४ रोजी वकीलपत्र नि.क्र.२५ वर देवुन हजर झालेले आहे. प्रस्तुतचे अर्जाचे समर्थनार्थ भिमराव शिवराम निरभवणे यांनी नि.क्र.३९ ला शपथपत्र व नि.क्र.३२ चे अर्जा समवेत नेरलेकर हॉस्पिटल यांनी भिमराव यांना दि.२७/०७/२०१४ रोजी भरती करुन ५/८/२०१४ रोजी सोडुन दिल्याचे पत्र व औषधांच्या खर्चाचे बिल दाखल केलेले आहे. दाव्याचे स्वरुप पाहता व वर नमुद केलेल्या उहापोहाचा विचार करता प्रतिवादी यांना त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करु न दिल्यास त्यांचे नुकसान होवु शकते याउलट त्यांची कैफियत दाखल करुन घेण्यास परवानगी दिल्यास मुळ दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकामी, प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याकामी, वादीस त्यांची केस प्रतिवादी यांचे उलटतपासामधुन पुष्टी व दुजोरा मिळविण्याकामी मदत होवु शकते. परंतु, त्याचबरोबर कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब

याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. यासर्व बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## ***<u>आदेश</u>***

०१. नि.क्र.३८ चा अर्ज खालील अटींवर मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रत्येकाने २००/- रुपये असे एकुण ४००/- रुपये वादी यांना खर्च म्हणुन दयावे.

०३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी पुढील तारखेपावेतो सदरची खर्चाची रक्कम वादी यांना दयावी. त्यानंतर त्यांनी दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल. आदेशाची पुर्तता करण्यास प्रतिवादी यांनी कसुर केल्यास सदरचा आदेश परिणामकारक राहणार नाही व दाव्याची स्थिती पुर्ववत राहिल याची प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

चांदवड
दिनांक : १२/०२/२०१९.

**(सु.बा. तोडकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क-स्तर,
चांदवड, जि. नाशिक.